Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4 डॉ.कल्याण साखरकर ISSN:-2230-7850

Research Papers

महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय लिंग गुणोत्तर

डॉ.कल्याण साखरकर
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख
फुलसिंग नाईक महिला महाविद्यालय, पुसदजि.यवतमाळ,
महाराष्ट्र राज्य,(भारत)

प्रस्तावना :–

लोकसंख्याशास्त्रात लोकसंख्या व नैसर्गिक साधन संपदा हे दोन घटक महत्वाचे आहेत. लोकसंख्येतील वृध्दी व आर्थिक प्रगती यांच्यात परस्पर संबंध आहे. कोणत्याही राष्ट्राची अथवा समाजाची प्रगती ही निसर्गनिमिर्तत उत्पादक घटकांचे रुपांतर करण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या मानवी भांडवल व बाजारपेठांवर निर्भर असते. मानवी समाज ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या भांडवलावर आपल्या मुलभूत भौतिक व अभौतिक गरजांची पूर्तता करण्याचा प्रमाणबध्द प्रयत्न करीत असतो. काही मानवी गटाव्दारे गरजांची पूर्ती करण्यास सक्षमता प्रकट केली जाते. तर काही मानवी गटाव्दारे असक्षमता व्यक्ती केली जाते. पण कोणत्याही राष्ट्रातील वा राज्यातील लोकसंख्येचा संबंध उत्पादन व उपभोगाच्या सक्षमतेशी वा क्षमतेशी येत असतो.

लोकसंख्येत लिंग गुणोत्तर प्रमाणाचा प्रामुख्याने विचार केला जातो. भारतीय लोकसंख्येतील 1911 ते 1921 या काळाचा अपवाद वगळता 1901 ते 1921 या दोन दशकात लोकसंख्येत 5.8 टक्काने वृध्दी झाली. 1921 ते 1951 या तीन दशकात 43.7 टक्क्याने आणि 1951 ते 1981 या तीन दशकात 87.7 टक्क्याने वृध्दीचा वेग होता. 1981 ते 1991 या एका दशकात लोकसंख्येतील जन्म व मृत्यू दराचे प्रमाण कमी झाले व लोकसंख्या वृध्दीचा राष्ट्रीय दर कमी झाला. या काळात लोकसंख्या शिक्षण व कुटूंब कल्याण कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली. 1991 ते 2001 या एका दशकात जन्म व मृत्युदराचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे लोकसंख्या वृध्दीचा संदर्भ आढळून येतो. या लोकसंख्य वृध्दीत पुरुष लिंगाची संख्या कमी स्त्री लिंगापेक्षा अधिक असल्याचे आढळून येत असल्यामुळे लिंग गुणोत्तराची समस्या निर्माण झाली. आहे.

1)लोकसंख्येची संरचना (Population Structure)

कोणत्याही राष्ट्रातील लोक संख्यात्मक संरचनेत लिंग गुणोत्तर प्रमाण, वैवाहिक स्थिती, जन्म–मृत्यु ग्रामीण–नागरी लोकसंख्या साक्षरता, वयोमान, आर्युमान इत्यादींचा अंतर्भाव केला जातो. लोकसंख्या संरचनेत लिंग गुणोत्तर प्रमाणाचा अभ्यास करणे महत्वाचे मानले जात आहे. भारतात एकूण लोकसंख्येत दर हजारी पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण किमान 945 वा 950 असणे आवश्यक आहे. लिंग संरचनेचा अभ्यास सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून केला जात आहे. लिंग संरचना म्हणजे लोकसंख्येतील स्त्री व पुरुषांचे प्रमाण होय. हे प्रमाण एक हजार पुरुषांच्या मागे किती स्त्रीया आहेत, या पध्दतीने प्रकट केले जाते. लिंग संरचनेचा जन्मदर व वैवाहिक प्रमाणावर प्रत्यक्ष परिणाम होत असतो. आणि श्रमशक्तीच्या पुरवठयावर अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. लोकसंख्येत पुरुष लिंगाचे प्रमाण अधिक असेल श्रमशक्तीचा पुरवठा अधिक प्रमाणात होत असतो. त्यामुळे स्त्रियांच्या सामाजिक दर्जावर कमी–अधिक प्रमाणात परिणाम आढळून येतो.

भारतातील लोकसंख्या संरचनेत लिंग गुणोत्तर प्रमाणात विषमता आहे. भारतातील लिग गुणोत्तर प्रमाणात फारसी तफावत नसेल तर संतुलन वा समतोल आहे असे गृहित मानले जाते. याउलट स्त्री लिंग गुणोत्तराचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमी वा अधिक असेल तर लिंग गुणोत्तरातील प्रमाणात असंतुलन आहे असे गृहित तत्व आहे. या असंतुलनाचा प्रभाव समाजाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनावर फार मोठया प्रमाणात पडत असतो. भारताच्या एकूण लोकसंख्येत पुरुष लिंग गुणोत्तरापेक्षा स्त्रीयांचे लिंग गुणोत्तर प्रमाणा अधिक असल्यास बहुपत्नी विवाहाची पध्दत प्रचलित होण्याची शक्यता असते. याउलट स्त्रीलिंग गुणोत्तराचे प्रमाण पुरुष लिंग गुणोत्तरापेक्षा कमी झाले तर विवाह हा पुरुष लिंगाकरिता समस्या निर्माण होवू शकते. आणि या समस्येतून लिंग गुणोत्तराची समस्या निर्माण झाली आहे.

लिंग गुणोत्तर प्रमाणातील वर्गीकरण :–

कोणत्याही राष्ट्रातील एकूण लोकसंख्येतील स्त्री व पुरुष यांच्यातील परस्पर सापेक्ष प्रमाणास लिंग प्रमाण असे म्हणतात. लिंग गुणोत्तर प्रमाणात विविध वयोगटातील लोकसंख्येचे वर्गीकरण करणे उपयुक्त मानले जाते. या वर्गीकरणानुसार उत्पादक व अवलंबित लोकसंख्येचा अंदाज लक्षात घेणे आवश्यक असते. 15 ते 64 या वयोगटातील लोकसंख्या श्रमाचा पुरवठा करणारी आहे म्हणून ती ''उत्पादक''

Please cite this Article as : *डॉ.कल्याण साखरकर , महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय लिंग गुणोत्तर* **: Indian Streams Research Journal (MAY ; 2012)**

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4

आहे. तर 0 ते 14 व 65 पेक्षा अधिक वयाच्या पुढील लोकसंख्यसा ''अवलंबित'' असते. या अवलंबित लोकसंख्येचा अपवाद वगळता 'उत्पादक लोकसंख्येचा' प्रामुख्याने विचार केला जातो म्हणून एकूण लोकसंख्येपैकी क्रियाशील लोकसंख्येचे प्रमाण वर्गीकरणातून उपलब्ध होत असते.

`नैसर्गिक नियमाने लिंग गुणोत्तरातील प्रमाणात समानता असायला पाहिजे. परंतु स्त्री लिंगाचे सामाजिक स्थान व आर्थिक परिस्थिती या घटकामुळे लिंग गुणोत्तरात विषमता वा असमानता निर्माण केली जात आहे. प्रगत व विकसित पुरुषप्रधान समाजात स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीचा सामाजिक व आर्थिक दर्जा दिला जात नाही. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात स्त्रीया सकस आहार व आरोग्याच्या दृष्टीने दुर्लक्षित असल्यामुळे वेगवेगळया वयोगटातील मुलींचा व स्त्रीयांच्या आकस्मिक मृत्यमुखी पडणा–यांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. मानव विकास निर्देशांकात स्त्रीयांच्या सामाजिक दर्जाला महत्वाचे स्थान दिले आहे.

लिंग गुणोत्तर प्रमाण दोन प्रकारे काढले जाते. पहिला प्रकार म्हणजे पुरुषांचे स्त्रीयांशी असलेले सापेक्ष प्रमाण निश्चित करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या लोकसंख्या विषयक वार्षिक पुस्तिकेसाठी पुरुषांची लोकसंख्या ग 100 आणि भागीला स्त्रीयांची लोकसंख्या या सुत्राचा अवलंब केला जातो. या सुत्राने काढलेले लिंग प्रमाण दर 100 स्त्रियांमागे पुरुषांची संख्या किती आहे हे कळत असते. जेव्हा लिंग गुणोत्तर प्रमाण 100 पेक्षा अधिक असते तेव्हा एकूण लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण अधिक असते.याउलट लिंग गुणोत्तर प्रमाण 100 पेक्षा कमी असते तेव्हा एकूण लोकसंख्येत स्त्रीयांचे प्रमाण अधिक असते.

लिंग प्रमाण निश्चित करण्याची दुसरी पध्दत दर हजार पुरुषांमागे स्त्रीयांची संख्या काढणे ही होय. लिंग प्रमाण

सारणी

महाराष्टl राज्यातील जिल्हानिहाय स्त्रीयांचे लिंग गुणोत्तर प्रमाण

अ. क्र.	महाराष्टlातील जिल्हे	*0–6 वर्षातील वयाच्या मुलींचे लिंग गुणोत्तर प्रमाण				1000 पुरुषांमागे स्त्रीयांचे प्रमाण			
		1991	2001	2011	घट /वृध्दी	1991	2001	2011	घट /वृध्दी
1	2	3	4	5	6	7	8	9	10
1	नंदुरबार	977	961	932	–16 –29	977	966	977	–11 +11
2	धुळे	947	960	876	–40 –31	947	907	944	–40 +37
3	जळगांव	925	880	829	–45 –51	925	867	933	–58 +66
4	बुलढाणा	945	908	842	–37 –66	945	915	946	–30 +31
5	अकोला	929	933	900	+4 –33	926	936	938	+10 +2
6	वाशिम	941	918	859	–23 –59	941	921	939	–20 +18
7	अमरावती	950	941	927	–9 –14	950	947	938	–3 +9
8	वर्धा	952	928	916	–24 –12	952	934	935	–18 +1
9	नागपूर	951	942	926	–9 –16	951	949	932	–2 +17
10	भंडारा	964	956	939	–8 –17	964	958	981	–6 +23
11	गोंदिया	987	958	944	–29 –14	..	964	1005	– ... +14
12	गडचिरोली	980	966	956	–14 –10	980	947	976	–33 +29
13	चंद्रपुर	965	939	945	–26 +6	965	944	948	–21 +4
14	यवतमाळ	961	933	915	–28 –18	969	942	942	–27 ....
15	नांदेड	960	924	897	–36 –27	960	944	942	–16 +2
16	हिंगोली	953	827	868	–126 +14	...	935	953	... +18
17	परभणी	956	923	866	–33 –57	956	926	958	–30 +32
18	जालना	951	903	847	–48 –56	951	914	951	–37 +37
19	औरंगाबाद	933	890	848	–43 –42	933	884	925	–49 +41
20	नाशिक	954	920	882	–34 –38	954	936	927	–18 –9
21	ठाणें	952	931	918	–21 –13	952	933	958	–19 +25
22	मुंबई उपनगर	930	923	910	–7 –13	930	919	822	–11 +97
23	मुंबई	942	922	874	–20 –48	942	898	777	–44 +121
24	रायगड	961	939	924	–22 –15	961	943	976	–18 +33
25	पुणे	943	902	873	–41 –29	943	906	919	–37 +13
26	अहमदनगर	949	884	839	–65 –45	949	890	940	–59 +50
27	बीड	939	894	800	–45 –93	939	898	936	–41 +38

Please cite this Article as : *डॉ.कल्याण साखरकर , महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय लिंग गुणोत्तर* **: Indian Streams Research Journal (MAY ; 2012)**

28	लातूर	947	918	872	−29	−46	947	923	935	−24	+12
29	उस्मानाबाद	947	894	853	−53	−41	947	927	932	−20	+5
30	सोलापुर	935	895	872	−40	−23	935	897	935	−38	+38
31	सातारा	941	878	881	−63	+3	941	884	995	−57	+111
32	रत्नागिरी	961	952	940	−9	−12	961	954	1136	−7	+182
33	सिंधुदूर्ग	963	944	910	−19	−34	963	946	1079	−17	+133
34	कोल्हापूर	931	839	845	−92	+6	931	859	949	−72	+90
35	सांगली	924	851	862	−73	+11	924	850	957	−74	+107

*Census of India 2011

डायरेक्टोरेट ऑफ सेन्सेस ऑपरेशन, महाराष्ट्र – 2001

स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्र राज्यात 1901 ते 1941 पर्यत दरहजारी पुरुषांमागे स्त्रीयांचे प्रमाण 978, 966, 950, 947 व 949 होते. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रात 1951, साली 941 होते. 1961–936, 1971–930, 1981–937, 1991–934, 2001–922 व 2011 साली 925 या प्रमाण होते. म्हणजे महाराष्ट्र राज्यात लिंग गुणोत्तर प्रमाणात असमानता आढळून येते.

0–6 वर्ष वयोगटातील लिंग गुणोत्तर प्रमाण हे महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येतील भविष्यकाळातील लिंग निहाय संरचनेचा कला दर्शविणारा महत्वाचा निर्देशक आहे.

संदर्भांकित सारणीत भारतीय जनगणना 1991, 2001 व 2011 अन्वये महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय 0–6 या वयोगटातील मुली व स्त्री लिंग गुणोत्तराची सांख्यिकीय माहिती सादर केली आहे. या सांख्यिकीय संदर्भावरुन 1991, 2001 व 2011 अन्वये रत्नागिरी जिल्हयात 0–6 वयोगटातील मुलींचे गुणोत्तर प्रमाण 961, 952, 940:1000 होते. तर 1991–2001 या दशकात स्त्री गुणोत्तरात 7 ने घट झाली. व 2001–2011 या दशकात 182 ने वृध्दी झाली. सिंधुदूर्ग जिल्हयात 0–6 या वयोगटातील मुलीचे गुणोत्तर प्रमाण 963, 944, 910:1000 असे होते. आणि मुलीचे घटते प्रमाण 19 व 34 होते. तर लिंग गुणोत्तर प्रमाण 963, 946, 1079:1000 या प्रमाणे होते. 1991 ते 2001 या दशकात लिंग गुणोत्तरात 17 ने घट झाली व 2001–2011 या दशकात 133 ने वृध्दी झाली. सातारा जिल्हयात 0–6 या वयोगटातील मुलींचे गुणोत्तर प्रमाण 941, 878, 881:1000 या प्रमाणे होते. 1991 ते 2001 या दशकात मुलीचे घटते प्रमाण 63 होते तर. 2001–2011 या एका दशकात 3 ने वृध्दी झाली. तर लिंग गुणोत्तर प्रमाण 941, 884, 995 : 1000 या प्रमाणे होते. 1991 ते 2001 या दशकात लिंग गुणोत्तरात 57 ने घट झाली व 2001–2011 या दशकात 111 ने वृध्दी झाली.

महाराष्ट्र राज्यातील मुंबई जिल्हयात 0–6 वयोगटातील मुलींचे गुणोत्तर प्रमाण 942, 922, 874:1000 याप्रमाणे होते. व 1991 ते 2011 या दशकात मुलींचे घटते प्रमाण 20 व 48 होते. तर लिंग गुणोत्तर प्रमाण 942, 898, 777: 1000 या प्रमाणे होते. 1991 ते 2011 या दोन दशकात लिंग गुणोत्तरात प्रमाणात 44 व 121 ने घट झाली. सांगली जिल्हयात 0–6 या वयोगटातील मुलीचे गुणोत्तर प्रमाण 924, 851, 862:1000 यास प्रमाणे होते. 1991 ते2001 या दशकात मुलीची घट 73 ने झाली तर 2001–2011 या दशकात मुलीच्या प्रमाणात 11 ने वृध्दी झाली. कोल्हापूर जिल्हयात 0–6 या वयोगटातील मुलीचे गुणोत्तर प्रमाण 931, 839, 845:1000 या प्रमाणे होते. 1999–2001 या दशकात मुलींमध्ये 12 ने घट झाली. जळगांव जिल्हयातील 0–6 या वयोगटातील मुलींचे गुणोत्तर प्रमाण 925, 880, 829:1000 या प्रमाणे होते. 1991–2011 या दोन दशकात मुलींमध्ये 45 व 51 ने घट झाली. लिंग गुणोत्तर प्रमाण 925, 867, 933:1000 या प्रमाण होते. 1991–2001 या एका दशकात 58 ने घट झाली तर 2001–2011या दशकात 66 ने वृध्दी झाली.

महाराष्ट राज्यातील अहमदनगर जिल्हयातील 0–6 या वयोगटातील मुलींचे लिंग गुणोत्तर प्रमाण 949, 884, 839:1000 याप्रमाणे होते. 1991 ते 2011 या दशकात मुलींमध्ये 65 व 45 ने घट झाली. स्त्री लिंग गुणोत्तराचे प्रमाण 949, 890, 940:1000 या प्रमाणे होते. 1991 ते 2001 या एका दशकात लिंग गुणोत्तरात 59 ने घट झाली तर 2001–2011 या काळात 50 ने वृध्दी झाली. औरंगाबाद जिल्हयातील 0–6 या वयोगटातील मुलींचे गुणोत्तर प्रमाण 933, 890, 848:1000 या प्रमाणे होते. 1991–2011 या दोन दशकात मुलींमध्ये 43 व 42 ने घट झाली. स्त्री लिंग गुणोत्तर प्रमाण 933, 884, 925:1000 या प्रमाणे होते. 1991–2001 या दशकात स्त्री लिंग गुणोत्तरात 49 ने घट झाली तर 2001–2011 या दशकात 41 ने वृध्दी झाली.

अमरावती जिल्हयातील 0–6 या वयोगटातील मुलींचे गुणोत्तर प्रमाण 950, 941, 927:1000 या प्रमाणे होते. 1991–2011 या दशकात मुलींमध्ये 9 व 14 ने घट झाली. स्त्री लिंग गुणोत्तराचे प्रमाण 950, 947, 938:1000 या प्रमाणे होते. 1991 ते 2011 या दोन दशकात लिंग गुणोत्तरात 3 व 9 ने घट झाली. नागपूर जिल्हयात 0–6 या वयोगटातील मुलींचे गुणोत्तर प्रमाण 951, 942, 926:1000 या प्रमाणे होते. 1991 ते 2011 या दोन दशकात मुलींचे घटते प्रमाण 9 व 12 होते. स्त्री लिंग गुणोत्तर प्रमाण 951, 949, 932:1000 या प्रमाणे होते. 1991 ते 2011 या दोन दशकात स्त्री लिंग गुणोत्तरात 2 व 17 ने घट झाली. गडचिरोली जिल्हयात 0–6 या वयोगटातील मुलींचे लिंग गुणोत्तर प्रमाण 980, 966, 956: 1000 या प्रमाणे होते. 1991 ते 2011 या दोन दशकात मुलींमध्ये घटाचे प्रमाण 14 व 17 होते. स्त्री लिंग गुणोत्तर प्रमाण 980, 947, 976:1000 या प्रमाणे होते. 1991–2001 या एका दशकात स्त्री लिंग गुणोत्तरात 33 ने घट झाली तर 2001–11 या काळात 29 ने वृध्दी झाली.

Please cite this Article as : *डॉ.कल्याण साखरकर , महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय लिंग गुणोत्तर* **: Indian Streams Research Journal (MAY ; 2012)**